दि. : 08/08/2019

प्रेस नोट

विद्युत शव दाहिनीद्वारे पर्यावरण संवर्धन

नाशिक- वायु प्रदुषणाचा स्तर कमी व्हावा, त्याचबरोबर विधी, परंपरा जपत आणि नागरिकांच्या भावना जपत स्मार्ट सिटी अंतर्गत नाशिक शहरातील पंचवटीत असलेल्या अमरधाममध्ये वर्षभरापूर्वी विद्युत शव दाहिनी सुरू करण्यात आली. त्या विद्युत शवदाहिनीचा सकारात्मकपणे आणि मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. गेल्या वर्षभरात येथे विद्युत शवदाहिनीचा वापर करत जवळपास 600 अंत्यविधी पार पडले. स्मार्ट सिटीने सुरू केलेल्या या प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने नाशिककरांचे हे सकारात्मक पाऊल आहे. दरम्यान, विद्युत शवदाहिनीच्या वापरामुळे लाकडाचीही मोठ्या प्रमाणावर बचत होत आहे. गेल्या वर्षभरात साधारणपणे प्रतिमाणसी 340 किलो लाकडाची बचत म्हणजेच वर्षभरात 2 लाख 4 हजार किलो लाकडाची बचत झाली आहे. मात्र, नुसती लाकडाचीच बचत झाली नाही तर, वायुप्रदुषणही काही प्रमाणात थोपवण्यास याद्वारे मदत होत आहे. विद्युत शव दाहिनीमध्ये अंत्यसंस्कारासाठी 5 ते 10 युनिट खर्च होत असल्याने वीजेचा वापरही मर्यादीत होत आहे. येणाऱ्या काळात नाशिककरांकडून विद्युत शवदाहिनीचाच मोठ्या प्रमाणात वापर होऊन पर्यावरण संवर्धनात हातभार लागणार आहे.

जनसंपर्क विभाग,

नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी

डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.